म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २५८६

कितीक सरले चैत्रउन्हाळे
कितीक सरल्या रात्री
किती किती समईतुन जळल्या
आठवणींच्या वाती

किती सुखांचे पाट वाहले
[illegible] माती
[illegible] कड कोसळले
[illegible] नाती.

REFBK-0025792
REFBK-0025792

# हिमगंध

दिलीप वि. चित्रे

संदर्भ काव्य

२५८६
२५७९२
२७।१२।८८

२५८६
काव्य २५७९२
२७।१२।८८



# हिमांध

# हिमगंध

( कवितासंग्रह )

दिलीप वि. चित्रे

REFBK-0025792
REFBK-0025792
मराठी ग्रंथ संग्रहालय

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

ह्या पुस्तकाचा प्रकाशन
समारंभ वॉशिंग्टन डी. सी.
( यू. एस. ए. ) येथे
२२ ऑक्टोबर १९८८ रोजी
आश्विन शुद्ध पौर्णिमा–
कोजागिरीच्या निमित्ताने
संपन्न झाला.

" HIMAGANDH "
POEMS BY
DILIP V. CHITRE

© शोभा चित्रे
6317 MERNA LANE.
LANHAM,
MARYLAND 20706,
U. S. A.

प्रकाशक
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार
पुणे ४११०३०

मुखपृष्ठ
सुभाष अवचट

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ 'शिवपार्वती'
पुणे ४११०३०

छायाचित्र
दिलीप वि. चित्रे

मूल्य : ५० रुपये

संस्कारांची मुळं
जिथं
प्रथम रुजली
त्या मातीला.
तिथल्या सगळ्यांना.

— दिलीप

# मनोगत

" तुम्ही काय स्वतःला कवी म्हणवून घेता काय ? "

शिकागोतल्या एका बाईंनी मला फोनवर एकदा ठणकावून सवाल टाकला होता. चुकून हाती पडलेल्या कुठल्यातरी मराठी नियतकालिकात त्यांनी ' कवी दिलीप चित्रे ' हा उल्लेख वाचला आणि त्या माझ्यावरच बिथरल्या.

मी चाचरत म्हणालो, " छेः छेः ! अहो, तुम्ही म्हणता ते चित्रे वेगळे. ते खरोखरच मोठे कवी आहेत. " पण मला पुढे बोलू न देता कोपरानीच खणत राहिल्या.

वास्तविक, कवी म्हणवून घेण्यापेक्षा कविता म्हणायचाच छंद मला अधिक. त्याही, इतरांच्या. त्याच थोरामोठ्यांच्या ऋणात वावरताना कसं प्रसन्न वाटतं. सातासमुद्रापलीकडे मिळणाऱ्या त्यांच्या कवितेच्या सहवासानं इथलं परकेपण गळून पडतं.

आज जवळ जवळ वीस वर्षं मी सतत इकडे आहे. त्यापूर्वी जोमानं कविता लिहिल्या. त्या अनेक नियतकालिकांतून वेळोवेळी प्रसिद्ध झाल्या. मग सगळीच दिशा बदलली. नंतरच्या काळात कविता लिहिल्या जरी नाहीत तरी कवितेशी संग सुटला नाही. आणि मग अचानक, इतक्या वर्षांच्या इथल्या वास्तव्याच्या अनुभवांमुळे निर्माण झालेली अस्वस्थता हळूहळू- मधूनच केव्हातरी कवितेच्या रूपानं कागदावर केव्हा येऊ लागली तेही कळलं नाही.

मागल्या वर्षी सौ. निर्मला देशपांडे इकडे आल्या होत्या. रात्री रंगलेल्या काव्य-शास्त्र-विनोदात त्यांच्या कविता ऐकता ऐकता एका गाफिल क्षणी मी माझ्याही दोन-चार कविता म्हणून गेलो. दुसऱ्या दिवशी सकाळीच माझ्या कवितांच्या सगळ्याच पत्रावळी पसरून त्या बसल्या. म्हणाल्या,

" यांचं काय करणार आहेस ? "

म्हणालो, " रेशमी वस्त्रात गुंडाळून काचेच्या कपाटात ठेवून देणार. "

" मी घेऊन जाते. "

" नको. हे आपलं इथेच बरं आहे. "

" का ? "

" मी म्हणतो म्हणून. "

त्या वैतागून शोभाला म्हणाल्या, " एकतर मी काय म्हणते आहे हे याच्या मठ्ठ डोक्यात शिरत तरी नाही किंवा माझ्या म्हणण्याची याला मुळीच किंमत नाही. "

मी मुकाट्यानं त्या पत्रावळींच्या फोटोकॉपीज काढून आणल्या आणि त्यांच्या हवाली केल्या. वाटलं, नेतील अन् विसरतीलही.

अन् तसंच झालं.

आणि ध्यानीमनी नसताना पुण्याहून मधुकाका कुलकर्ण्यांचं पत्र आलं. तशी त्यांची पत्रं नेहमीच येतात. " कुंपणापलीकडले शेत " पासून जडलेला आमचा स्नेह आता अशा थराला आला आहे की माझ्या कवितांचं बाड मी स्वतः न पाठवता त्यांच्या हाती दुसरीकडून पडावं हे त्यांना मानवलं नाही.

त्यांनी माझा सूड उगवायचं ठरवलं. त्यांचं पत्र आलं, "तुमच्या कवितांचा संग्रह छापायला घेतला आहे. "

आणि मग मी पुरा हादरलो.

संग्रह प्रकाशित होतो आहे हे कळलं तेव्हा श्री. श्री. पु. भागवतांचं पत्र आलं. त्यांनी लिहिलं, " तुम्ही आत्मप्रत्यय प्रमाण मानूनच विचार करायला हवा. आजकालच्या मराठी कवितेचा संदर्भ मनात ठेवून आपली कविता पाहावी, पण त्या संदर्भाने बंदिस्त होऊन जाऊ नये. तुमची या संग्रहाच्या रचनेची कल्पना काय आहे, कोण जाणे. सगळ्या कवितांचा विचार करून, त्यांतल्या विविध जाणिवा किंवा त्यांच्या अवस्था त्यात प्रतिबिंबित होतील अशी निवड करणार आहात, की जी विविध रूपांची कविता तुम्ही लिहिली आहे, तिचा प्रातिनिधिक असा हा संग्रह व्हावा असे ठरवीत आहा ? मी

एवढेच सुचवीन की तुम्ही संग्रहासाठी कवितांची निवड कराल ती कठोरपणे करा."

मग मी सटपटलोच.

जुन्या–नव्या कवितांची सरमिसळ असलेला हा संग्रह. तसा प्रातिनिधिकच. पण परदेशी वास्तव्यातील अस्वस्थतेचं प्रतिबिंब असलेल्या कविता यात अधिक. "ऐलतीरावर" ही न्यूयॉर्कमध्ये निघालेली माझ्या कवितांची ध्वनिमुद्रिका आणि "स्वर हे पश्चिमरंगी" या मुंबईत ध्वनिमुद्रित झालेल्या 'कॅसेट'मधील काही कविता यात अंतर्भूत केल्या आहेत – काही वगळल्या. एकंदर कवितांमधून या संग्रहातील कवितांची निवड कितपत कठोरपणे झाली आहे कोण जाणे!

तसं माझं हे पहिलंच पुस्तक. आणि परदेशातून लिहिल्या गेलेल्या मराठी कवितांचाही हा पहिलाच संग्रह असावा. पण पहिलेपणाचा आनंद मी यापूर्वीही, "कुंपणापलीकडले शेत" या परदेशस्थ लेखकांच्या कथासंग्रहाच्या प्रकाशनाने अनुभवलेला आहे. तोसुद्धा, या संग्रहाप्रमाणेच श्री. मधुकाका कुलकर्णी यांच्या सहकार्यामुळेच साध्य झाला होता. मधुकाकांचे औपचारिक आभार मानणं म्हणजे त्यांच्या माझ्या स्नेहाचा अनादर करण्यासारखं होईल. श्री. चिं. स. लाटकर यांच्याबद्दलही तेच म्हणावं लागेल.

सुभाष अवचटांनी रंगवलेली अनेक सुंदर सुंदर मुखपृष्ठं मी आस्थेनं पाहात आलो आहे. या संग्रहालासुद्धा त्यांच्या वेष्टनाचा आनंद लाभावा हा योगायोगच.

सौ. निर्मला देशपांडे यांनी सातासमुद्रापलीकडे या कवितांचं बाड जर नेलं नसतं तर त्या इकडे काचेच्या कपाटात सुखात राहिल्या असत्या. तेव्हा तसा सगळा दोष त्यांचाच. असो.

चार जुलै, अठ्ठ्याऐंशी

दिलीप वि. चित्रे

४ जुलै ८८

## अनुक्रमणिका

२५८६
काव्य २५७८२
२७१९५८८

| | | |
|---|---|---|
| १ | हिमगंध | १ |
| २ | सशक्त झाडांची पाने | २ |
| ३ | आकारून आले आहे | ३ |
| ४ | प्रवास | ४ |
| ५ | मी | ५ |
| ६ | लहान असती शब्द | ६ |
| ७ | मुक्त झालो शृंखलेतुन | ७ |
| ८ | भाकित | ८ |
| ९ | कणाकणांतुन | ९ |
| १० | मज तूच हवी | ११ |
| ११ | स्वागतास माझ्या आज | १३ |
| १२ | विहीर | १४ |
| १३ | शपथ | १६ |
| १४ | शेवटल्या दिवशी | १७ |
| १५ | माझा मार्ग बुजलेला | २० |
| १६ | एका विराट रात्री | २१ |
| १७ | ऐलतीरावर | २२ |
| १८ | देह झाकावया | २३ |
| १९ | दिलेस लोटून | २४ |
| २० | रक्ताच्या थेंबाशी | २५ |

२१ गुलमोहर २६
२२ कधी असूयेच्या पोटी २८
२३ आषाढ...श्रावण २९
२४ आभाळ ३०
२५ आणिक माझ्या नभास ३२
२६ किरणांवर अदृश्याच्या ३३
२७ पुढाकार ३४
२८ अनिल ३६
२९ डोह ३८
३० आठवण ३९
३१ तावदानाच्या आत-बाहेर ४१
३२ पेला जरी रिकामा ४३
३३ मौनाची भाषा ४४
३४ तेच सूर—तेच गीत ४५
३५ माझ्याच कातडीचे ४६
३६ माझ्याच चितेवर जळले ४७
३७ सूर लागता लागता ४८
३८ अशी कशी कुणासवे ५०
३९ निरखू नका ५२
४० सुरुंग ५३
४१ वेड मला ५४
४२ एक झाली चूक आता ५६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५८६
काव्य २५.५.९२
२५।७२।८८
शाखा


| | | |
|---|---|---|
| ४३ | तयारी | ५८ |
| ४४ | ढोर | ५९ |
| ४५ | माझे रुंदावता पंख | ६१ |
| ४६ | स्ट्रिपटीझ | ६३ |
| ४७ | संपले का सांग सारे | ६५ |
| ४८ | अवसेच्या रात्रीमधला | ६६ |
| ४९ | मी निघालो तेव्हा | ६७ |
| ५० | अंतर | ६८ |
| ५१ | झाले पोटुशी आभाळ | ६९ |
| ५२ | भेदून सूर्य सगळे | ७१ |
| ५३ | कधी कधी वाटायाचे | ७२ |
| ५४ | ओळख | ७३ |
| ५५ | हळदीच्या ओल्या वाटा | ७४ |
| ५६ | रंगुन गेले | ७५ |
| ५७ | ज्या दिशेचा रंग खुणवी | ७६ |
| ५८ | नाती | ७८ |
| ५९ | प्रश्न | ७९ |
| ६० | ही असली मुग्ध | ८० |
| ६१ | हिमगंधाच्या लाटा | ८१ |
| ६२ | नांदी | ८२ |


•

हिमगंध

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ..........

१

## हिमगंध

हिमगंध जेथुनी येतो
वेढून लपेटुन सारे
त्या दिशेस कवटाळाया
प्राणांचे उत्सुक वारे

ज्या धवल-थंड गंधाच्या
हळुवार कळ्या हातांत
गुंफितो हार मी त्यांचा
माझ्याच उष्ण श्वासांत

डोळ्यांतुन ओघळलेले
हे स्फटिक-हिमाचे मोती
गोठल्या स्मृतींच्या पार
निःशब्द आमुची माती.

## २

### सशक्त झाडांची पाने

सशक्त झाडांची पाने गळू लागतात
तेव्हा उन्हाळा संपलेला असतो

निष्पर्ण झाडांची बोटे आभाळात घुसतात
तेव्हा बहर ओसरलेला असतो

कुरकुरीत बर्फाची तलम चादर अंथरली जाते
तेव्हा आठवणींच्या बीजांना कोंभ फुटतात

याच वेळी माझ्या मनात भडकलेला
एक गुलमोहर फुलत असतो.

# ३

## आकारून आले आहे

आकारून आले आहे आज काहीसे उरात
ज्याचे न्याहाळता येईना रूप-रंग आणि जात
वाटे दिसावे स्वरूप आणि मोहात रुतावे
साऱ्या जाणिवेस आपोआप अस्तित्व कळावे.
स्पर्श व्हावा हलकासा- अंग शहारून यावे
नवे नवेच रुपडे पापणीत साठवावे
नाते अखंड- अभंग वाटे अतूट रहावे
एकमेकांच्या साथीने कधी हसावे-रडावे.

पण विरळ आकार नसे स्फटिकासारखा
माझ्या श्वासांत कोंडतो त्याच्या तृप्तीचा हुंदका
मिठी घालता हळूच काही येईना कवेत
जसा तलम धुक्याचा पट विरतो हवेत
आकारून आले आहे आज काहीसे उरात
ज्याचे न्याहाळता येईना रूप-रंग आणि जात.

# ४

## प्रवास

गाणे शोधत शोधत मी आलो दूर दूर
इतका वेळ जवळ होता तो गेला कुठे सूर ?

जिथून चालत आलो ती हरवून बसलो वाट
उरले नाहीत कुणाचेही हाती आता हात

रक्ताळलेल्या जखमांची पावलांनाही सवय
अंधारातच चाचपडणे विसरून आता वय

कधी सापडतो एखादा सूर– त्याची निराळी जात
जानव्यामधली शहारून उठते भोळी ब्रह्मगाठ

आता फक्त चालायचेच नवी गाणी शोधत
आपल्याच किंकाळ्यांच्या समेवर टाळ्या पिटत पिटत.

## ५

## मी

मी आहे सम्राट
नसलेल्या राज्याचा

मी आहे सेनापती
नसलेल्या सैन्याचा

मी आहे पुढारी
नसलेल्या प्रजेचा

मी आहे पुजारी
नसलेल्या देवाचा

मी आहे अभंग
नसलेल्या संताचा

मी आहे आरंभ
नसलेल्या अंताचा

६

## लहान असती शब्द

लहान असती शब्द परंतू
विराट असते माया
कोमल हळवा स्पर्श त्यामधे
विरक्त असते काया.

गूढच असते स्वप्न त्यातुनी
सुजाणता उलगडते
गंधित होता माती सगळे
संवेदन पाझरते.

७

## मुक्त झालो शृंखलेतुन

मुक्त झालो शृंखलेतुन बंध आता कोणते
उमगले नाही परंतू मार्ग चालू कोणते

कोठल्या वस्तीत आलो कोठली माती इथे
रत्न-पाचूंच्या हवेल्या – दार माझे कोणते

प्यार आता कोठडी अन् आतल्या साऱ्या खुणा
मखमली सौख्यास राजी हृदय नाही जाणते

ऐकले झाली कवाडे बंद माझ्या मागुती
कोंडल्या श्वासांत त्यांच्या श्वास माझे कोणते

मोकळी पाटी पुढे भवितव्य सुंदर रेखण्या
कुंचले हाती परंतू रंग योजू कोणते

घालतो सूर्यास शपथा मार्ग माझा दाविण्या
तोच होता आंधळा मी दीप लावू कोणते

## ८

### भाकित

माझ्या स्पर्शाचा सुगंध
इथल्या फुलांना येणार आहे

माझ्या हर्षाचा आनंद
फुलत्या कळ्यांना होणार आहे

माझ्या रात्रीच्या कुशीत
यांची सूर्यफुले उमलतील

माझ्या अश्रूंच्या मुशीत
इंद्रधनुष्ये उजळतील

माझ्या हाकेचा पडसाद
यांच्या कानांवर आदळेल

तेव्हा—
माझ्या राखेचा बुरुज
तृप्त जाणिवेत वितळेल

१

## कणाकणांतुन

कणाकणांतुन
स्फुरले माझ्या
हास्य उन्हाचे—
पिवळे नाजुक...
रगेल–रंगित
बालिश तरिही
प्रौढ–पणाची
उगाच नटवी
कांती लेवुन
...कणाकणांतुन.

कणाकणांतुन—
स्त्रवली माझ्या
दुपारची झळ
प्रगल्भ होऊन
मत्तपणाने
तुडवित पाणी
अवखळ...अल्लड
विचारमाला
कोमलतेची—
...कणाकणांतुन.

कणाकणांतुन—
हसली माझ्या
नीरव संध्या—
—नीरव संध्या
प्रशांत समयी.
क्षणाक्षणाचे
प्राक्तन अवघे
लकेरीत त्या
उगाच ढळले
विरघळले...
विरघळले
...कणाकणांतुन.

कणाकणांतुन—
सरली माझ्या
रेघ विजेची
गिरकी घेउन.
—निळ्या नभाच्या
अनंततेच
इवले कोमल
बिंब उमटले
हृदयी.

१०

## मज तूच हवी

रात्र हवी.
उत्कट गहिरी रात्र हवी.
निळ्या नभाच्या डोहामध्ये
थरथरणारा
एक एकला चंद्र हवा.

काजळडोही सळसळणारी
एक मासळी
अधिर हवी.

मातीमधला सुखावणारा
गंध आणखी
गडद हवा.

क्षितिजकडांशी भिडलेली
जाणीव जराशी
रुंद हवी.

हळव्या स्पर्शातच दडलेली
रसरसत्या कांतीने न्हाऊन

स्वप्निलडोही
डुचमळणारी - बावरणारी
निकट आणखी
तूच हवी—
मज तूच हवी.

## ११

### स्वागतास माझ्या आज

स्वागतास माझ्या आज आभाळाचे धन
सोहळ्यात हळूवार आनंदले मन

परलेले रंग असे ओथंबून जाती
माझ्यासंगे यांची अशी युगांचीच नाती
मोहरले आसमंत हरपले भान
स्वागतास माझ्या आज आभाळाचे धन

पाझरते ढगांच्याही जाळीतून आभा
आलिंगन देण्यासाठी जीव झाला उभा
खुळे झाले मन आणि देह गतिमान
स्वागतास माझ्या आज आभाळाचे धन

चोहीकडे कुजबुज रंगुनीया गेली
अधोमुख लज्जांकित बावरल्या वेली
घेऊनीया निरोप तो आले पान पान
स्वागतास माझ्या आज आभाळाचे धन

## १२

## विहीर

तुम्ही कधी हिरेमाणकांनी मढवलेल्या
खोल विहिरीत पडून पाह्यलंय ?

त्या गर्द काळोखाच्या तळाशी असलेले लखलखते हिरे.
त्यांचा स्पर्श किती सुखावणारा असतो.
डोळे दिपवून टाकणारा तो प्रकाश—
अपूर्ण राहिलेली सगळी स्वप्नं त्या तिथे
पुरी करून घ्यावीशी वाटतात.

पण होतं काय की
हिरेमाणकांची नवलाई ओसरल्यावर
विहिरीच्या खोलपणाची जाणीवच जास्त तीव्र होते.
बाजूच्या उंचच उंच गोल खोल भिंती
जास्तच निसरड्या झाल्यासारख्या वाटतात.

आपल्या तोंडातून न फुटलेली एखादी
अस्फुट किंकाळी
हिरे-माणकांच्या परावर्तित किरणांप्रमाणे
गोल गोल आपल्यालाच गुरफटते.

मग हिरे-माणकांचे प्रकाशकिरण विरून
विहिरीत गडद् गडद् काळोखच तेवढा उरतो.
अशा वेळी
तो दूरदूरचा एवढासा आभाळाचा तुकडा
हातातल्या हिरे–माणकांपेक्षा किती हवाहवासा वाटतो
त्याची तुम्हाला काय कल्पना ?

## १३

### शपथ

चंद्र मावळून गेला तरी
रात्र अजून उत्सुक आहे
फुले मिटून गेली तरी
गंध अजून तसाच आहे

आठवणींचे तुटले धागे
एक बंध उरात आहे
जखम बरी झाली तरी
अजून काही सलत आहे

कौरव शरण आले तरी
महाभारत अटळ आहे
तुमच्या-आमच्या सूर्यालाही
आज माझी शपथ आहे.

# १४

## शेवटल्या दिवशी

शेवटल्या दिवशी तर घर नुसतं भरून गेलं.
वेळ थोडाच उरलेला.
कुणाकुणाशी बोलणार ? अन् बोलणार तरी काय ?
नात्याची-गोत्याची-ओळखीची.
दुसऱ्या कुणाच्या तरी ओळखीन उत्साहात आलेली.
लहान मुलं— मित्र.
हार घेऊन आलेली शेजारपाजारची तरुण पिढी.
आणि समोरच्या पडक्या वाड्यातले कामगार लोक सुद्धा.
सगळीच.

का ?
कशासाठी ? मी काय केलंय एवढं यांच्यासाठी ?
की मला लाजवण्यासाठी ?
नाही.
त्यांच्या नजरेतले भाव मला कित्येकदा
झोपेतून खडबडून जाग आणतात.

जिथे शब्दांची देवाणघेवाण सुद्धा व्हायला वेळ उरला नव्हता
तिथे फक्त त्यांचे डोळेच खूप काही सांगून गेले.
जपून जा रे बाबा.
आता पुन्हा केव्हा येशील ? लौकर ये रे राजा.

किती रे वेळ लागतो पोचायला ?
आणि पैसे रे किती पडतात जायला ? — भाबडे प्रश्न.
शब्द नाहीच. फक्त डोळेच.

माझ्यापेक्षा वयाने कितीतरी मोठ्या असलेल्या
कामगार वृद्धेने मला वाकून नमस्कार केला
तेव्हा मी केव्हढा गलबललो !
वाटलं, थुत् आमच्या शिक्षणाची. थुत् आमच्या ज्ञानाची.
मग मीही झटपट नमस्कारांची एक फैर झाडून टाकली.

भरलेल्या सामानाच्या बॅगा उचलून कुणीतरी
जवळच्या पिठाच्या गिरणीवर वजन करायला नेल्या.
टेक केअर, सेन्ड लेटर सारख्या सिगरेटच्या धुराआड
लपलेल्या सुशिक्षित शब्दांनीही मन मोकळं करून टाकलं.

घरातली माणसं तर
या, या च्या स्वागतात आणि
चहाचे कप भरण्यातच गढलेली.
त्यांच्या तर डोळ्यांनाही उसंत नव्हती— बोलण्याची.
पण घरात वावरणाऱ्या त्यांच्या आकृतीच बोलत होत्या.
शेवटी हातावर दहीसाखर ठेवताना
आईने न बोलताही केवढं केवढं सांगून टाकलं.

सगळी बंडखोरी मेणासारखी वितळून गेली.
वरून आणलेलं उसनं अवसान कायम.

पण आत नायगरा उसळलाय.
हे सगळे बंध मला अधिकाधिक घट्ट
आवळू पहाताहेत.
मी त्यात गुदमरतोय. नाही, स्वतःला मुद्दाम गुदमरून घेतोय.
होऊन जाऊ द्या—
एक... दोन...

हे काय ?
मला जाग केव्हा आली ?
की मी अजून जागाच आहे ?
किती वाजले ? अरेच्चा, उशीर झाला.
पटकन् शॉवर-ब्रेकफास्ट आटपायला हवं.
आज बोर्डाची मीटिंग आहे.
आपण आज बाजी मारणारच.
आणि उजवा डोळा अजून फडफडतोय.
घरचं पत्र आज यायलाच हवं.

## १५

## माझा मार्ग बुडालेला

माझ्या डोळां आसू एक
नीरव रात्री टिपलेला
रात्र रात्र टिपताना
ओल्या रात्री भिजलेला.

आंसू एक .. आंसू एक
दारापाशी ओठंगून
उभी असताना तुझ्या
गालावर सांडलेला.

एक आंसू–तुझा माझा
दीर्घ नभा–एवढासा
दुःख दुःख पेलताना
पुरा पुरा निढावलेला

एक आंसू कधी काळी
डोळ्यांतून सरलेला...
त्याच्या शोधामधेच गा
माझा मार्ग बुडलेला !

१६

## एका विराट रात्री

एका विराट रात्री
मी ऐकतो तराणे
ओठांत गुंतलेले
ते धुंद एक गाणे
काळ्या नभी निखारे
तो चंद्र पेटणारा
अंगारयुक्त झाडे
प्रक्षुब्ध हाय वारा
सारे असे परंतू
माझे नवेच असणे
मी ऐकतो खुषीने
ते धुंद एक गाणे

ते धुंद एक गाणे
रिझवी मनास माझ्या
नेत्रांतल्या स्मृतींची
पुढती नवीच छाया
आता तुझे नसू दे
शृंगारपूर्ण येणे—
मज फक्त आठवावे
ते धुंद एक गाणे

१७

## ऐलतीरावर

विस्मरलेल्या
शुभ्र धुक्याचे
मनात वादळ उसकटते

मोरपिसांच्या
आठवणींचे
उगाच जाळे विसकटते

हिमस्पर्शाच्या
डोहामधले
सुख काटेरी थरथरते

अर्धोन्मीलित
नेत्रांमधली
उत्सुक राधा बावरते

अलगुज इवले
ऐलतीरावर
ओठावरती घुटमळते

पैलतीरावर
असे कसे ग ऽऽऽ
जल कटिवरती डुचमळते ?

## १८

### देह झाकावया

देह झाकावया
ओढिले आकाश
अंतरीचा पाश
तोडवेना.

झालो पोरका रे
तुझ्यावीण देवा
आता तुझा धावा
आठवेना.

पुरे पायपीट
जन्माचीच झाली
मात्र उरे खाली
दुःखवेणा.

शीणल्या जीवासी
नको असा ताण
फक्त तुझे ऋण
फेडवेना.

## १९

### दिलेस लोटून

दिलेस लोटून
मायेच्या जगात
परी अंतरात
राहे सल.

झालो मी बापुडा
नित्याची व्यसने
रंगीत बासने
कोमेजली.

व्रण झाले दाट
झेलता आघात
संपलीसे वाट
नसे मुक्ती.

परी एक आशा
तेवढा दिलासा
म र्ग हळवासा
हृदयात.

एवढे स्मरून
चालतो जपून
कधी ठेचाळून
जगात गा.

## २०

### रक्ताच्या थेंबाशी

रक्ताच्या थेंबाशी
राखले ईमान
गुंतले दावण
तुझ्यापाशी

मुक्त कंठातून
गायलो तराणे
डोळ्यांतुन प्राण
सांडो आले

कळो आले तेव्हा
झालो बेईमान
माझ्याशी मीच
नव्हतो गा.

## २१

## गुलमोहर

माझ्या खिडकीतून दिसतो मला
एक वठलेला गुलमोहर.
त्याच्या जीर्ण-जर्जर फांद्या
आणि चेहऱ्यावरचे सात्त्विक भाव—
अनुभवाचा शहाणपणा
यामुळे वाटावा तो एखाद्या
वृद्ध इतिहासकारासारखा
एवढा अनिश्चित.
कोंबड्याची तुरेदार बांग ऐकून
मी उठतो
`तव्हा तो सुस्तच असतो
पहात यौवनातली दिवास्वप्नं—
युवतींचे थरारणारे थवे
बिलगून बसलेले पायथ्याशी कधीकाळी.
माझ्याशी तो खूप बोलतो
सांगतो एकेक रोमांचक कथा
शृंगाराच्या- केशरी फुलांनी मढवलेल्या.
तेव्हा त्याचा आवाजही
किंचित कापरा होतो— आणि कमी होतात
अंगावरच्या कैक सुरकुत्या.

कधी कधी मात्र
काठी टेकून उभा राहतो
आणि शिकवतो अज्ञान
प्राथमिक शिक्षकाप्रमाणे !
तेव्हा त्याची दया येते.
वाटतं,
याच्याहूनही खूप उंच होऊन
फिरवावा त्याच्या पाठीवरून हात
सहानुभूतीने.

तो संतापतो
तेव्हा मात्र मी घाबरतो.
केशरी फुले होतात एकदमच लालभडक
आणि फांद्याफांद्याही काळ्या ठिक्कर पडतात.
उरली सुरली पानेही
हळूच निखळतात फांद्यांपासून
आणि निघत नाही त्याच्या तोंडातून
किंचितही शब्द.
मग मी तोंडावरून पांघरूण घेऊन
हळूच कूस बदलतो
आठ वाजेपर्यंत.

माझ्या डोळ्यांपुढे असतो मात्र
तोच वठलेला गुलमोहर !

## २२

### कधी असूयेच्या पोटी

कधी व्हावे दुःख थोडे
नयनांत यावे मेघ
आणि आकाशधारांचा
यावा डोळ्यांतुन ओघ.

कधी थोडेसे हसावे
हळू मनात लाजून
जसे पारिजातकाने
यावे पहाटे फुलून.

कधी थोड्याशा हर्षाने
व्हावे बेभान. . .बेभान–
मनी राधेच्या रूपाने
आर्त मुरलीची तान

कधी किंचित रुसावे
जसा कैकेयीचा कावा
कधी असूयेच्या पोटी
राम वनवासी व्हावा !

## २३

### आषाढ...श्रावण

पहा चालला चालला
खुळा आषाढ...श्रावण
मन झिंगलेले जाई
मागे...तोडुनी दावण

धूळ जमिनीत शिरे
उभे श्वासांचे वादळ
पर्णापर्णांच्या डोळ्यांत
राही अडलेली कळ
रुते मातीत पाऊल
मऊ...हळवासा स्पर्श
कणाकणांतुन तिच्या
गंधवेदनेचा हर्ष
श्वास श्वासातहि अडे
मेघ कडाडता वरी
जागी थरथरे झाड
वेल बिलगते उरी.

असा चालला चालला
खुळा आषाढ...श्रावण
मन हाकारीत राही
उरे फक्त आठवण

## २४

### आभाळ

मंद गतीने आभाळातून
सरकणाऱ्या काळ्याकुट्ट मेघांचे
मला काहीच वाटत नाही.
सर्वदूर पसरलेले आभाळाचे
कद्रू काळेपण
माझ्या मनास स्पर्शच करीत नाही.

मात्र
घरासमोरच्या विजेच्या तारेवर
बसलेला काळाभोर पक्षी
मनात उलटा लोंबकळतो
विजेचा धक्का लागल्याप्रमाणे
आणि
त्याच्या बुबुळांत त्या काळ्याकुट्ट आभाळाचे
प्रचंड प्रतिबिंब
हिंदोळत रहाते.

जेव्हा मी मोठा होतो
तेव्हा मनातली भीतीची निःशब्द पोकळीही
वाढते आभाळाएवढी

आणि
उलटा लोंबकळणारा पक्षी
त्यात दूर दूर उडून जातो.
खूप खूप मोठा होत
काळ्याकुट्ट आभाळाएवढा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५८६
काव्य

## २५

### आणिक माझ्या नभास

दिशा-दिशांतुन झाकळलेल्या अश्रूंवरचे
कवच अचानक आजपासुनी विरले आहे
मनात जपल्या कैक दिसांच्या गाण्यामधला
शब्द अचानक ओठावरती फुलतो आहे.

निसर्गातला वसंत अवघा प्रसन्न होऊन
नव-तेजाचे दान मला तो देतो आहे
अन् आकाशी रंग मला तो हवाहवासा
क्षितिज जराशी रुंद होऊनी खुणवित आहे,

समोर माझ्या उडते आहे खुळे पाखरू –
पंख अधिकची बळकट असती त्याहुन माझे
धडक घ्यावया सूर्यामधल्या नवतेजाशी
नजर अचानक तिथे जाऊनी भिडते आहे.

आज जाहले माझ्यामधले बळ पोलादी
हृदयावरती घण दुःखाचे पेलत आहे –
साथ लाभली आज चिरंतन दो हातांची
आणिक माझ्या नभास अंकुर फुटला आहे.

## २६

### किरणांवर अदृश्याच्या

किरणांवर अदृश्याच्या मी स्वार होउनी बसलो
तिमिरात आज आशेची मी पहाट होउन बसलो

तोडिता फुले स्वप्नांची ते वृक्ष गोठले होते
हिरवेपण जतन कराया मी बीज होउनी बसलो

चौफेर उधळले घोडे— हरवल्या दिशाही दाही
वाटेवर या वळणांच्या संकेत होउनी बसलो

वणव्यात भडकले रान पेटता विझेना काही
इतुक्यातच कोसळणारा मी प्रपात होउन बसलो

जग कोसळताना सारे प्रलयाच्या तुफान वेळी
मी स्वर्ग-धरेच्या मधला आधार होउनी बसलो

सरसावुन शस्त्र विषारी बेईमान करिती हल्ले
ते हातच कलम कराया मी खड्ग होउनी बसलो

## २७

### पुढाकार

ती गेली. एकटीच. एकदम्‌च. सवाष्ण असताना
चार पोरे पाठीशी ठेवून. भाकरीच्या तुकड्याशी
संपर्क साधताना.

तो रडला. ओक्साबोक्शी. छाती पिटून. डोके आपटून.
दुःखार्द्र नेत्रांनी उचलली तिरडी–आपणच पुढाकार घेऊन.

फक्त चौघे, त्यांची आठ पावले–स्मशानाची वाट चालत होती.
तिघांना कामाची घाई. त्याला आयुष्याची चिंता होती.

एकंदर चार पोरं. साली जन्माला तिनंच घातली.
महिना ३० रुपये कमाई बुडवून आज तिरडीवर
खुशाल झोपली.

तो वैतागला. मनातल्या विचारांवर घातलं
आभाळाचं पांघरूण
दात-ओठ खाल्ले. आसवं टिपली. तिरडीला घट्ट आवळून.

डोळ्यांची चाकं मागे गेली. सात वर्षे पुढे लोटून
सात पावलं दोघांची. होमाभोवती पार गेली धुरकटून.

सात वर्षं. चार पोरं. एक नवरा. असा तिचा सरळ हिशेब.
तो बसे चिलीम फुंकत... घास गिळीत. गाठी नसे
कसला निषेध.

त्याला सवय झाली गिळण्याची. घास... शिव्या...
अश्रू आणि दुःख...
सात वर्षेही त्याने मुकाट गिळली. गळ्यात अडकून होते दुःख.

त्याची छाती रुंद होती. दगडाची. पण कुठेतरी पिचलेली.
पोरांपायी तो बाप. एवढंच. बाकी सर्वच संधी हुकलेली.

आयुष्यातले पहिले कार्य. त्याने मनापासून पुढाकार घेतला.
चिता पेटवून बाजूला-पारावरती मुकाट अश्रू गिळीत बसला.

## २८

### अनिल

तो येतो :
समुद्र-लाटांवर आपली फेसाळ पदचिन्हे उमटवीत...
झणत्कारत.
दूर क्षितिज टोकापासून पुढे... पुढे.
जेथे प्रचंड उष्णतामानाचा लाव्हारस श्रान्तपणे
गडप होत-होत जातो पाण्याच्या अंधुक रेषेतून
सरळ खाली— उगमाच्या दिशा बदलण्यासाठी
थेट तेथून.
पायात पैंजण बसले नवपरिणित वधूसारखे
तरी नेमकी लय असते साधलेली—
लाटांच्या हेलकाव्यांबरोबर.
स्वातीचा थेंब गर्भात जपणारे चिप्प शिंपलेही
खालीवर होतात हारीने— त्याच्याच लयबद्धतेत.

झावळांच्या जावळांना स्पर्शून जाताना
तो शीळ घालतो. अस्फुटशी.
डेरेदार वृक्षाच्या डोलीत गडप झालेला
सुतारपक्षी आतून टक् टक् करून दाद देतो
आपल्या अभिजात रसिकतेची— तेव्हाच.

तो येतो :
कधी मिट्ट चांदणे झिरपते वाळूत तेव्हाच.
दोन डोकी... अंधारमय किनाऱ्यावर हालतात
स्वतःच्याच प्रतिमा लाटांवर हेलकावताना
त्याने आणलेल्या गंधाने शहारून.
अस्फुट... उष्ण श्वास तो घेऊन जातो
अलगद. एखादे गाणे देऊन जाताना.

तो येतो :
कधी उत्तरेकडून—पश्चिमेकडून—वायव्येकडून
तर कधी आणखीही कोठून.
दिशा-दिशांशी नाते जोडत आपल्या अस्तित्वाचे.
कधी आणतो समवेत
रक्तलांछित संदेश-दूर देशीचे... कधी आवर्तने...
कधी भोवरे.
कधी घालतो थैमान आपल्या अस्तित्वाचे.
गोल गुरफटून स्वतःत उभ्या विश्वाला भिरकावू पहातो
उंच अस्मानाकडे— कदाचित असूयेने.

शेवटी वावरायचे असते त्याला
तुमच्या-आमच्यातच — क्षितिजटोकापासून वहात येत...
समुद्रलाटांवर आपली फेसाळ पदचिन्हे उमटवीत...
झणत्कारत.

## २९

### डोह

गावाबाहेरच्या काळ्याशार डोहासारखे
तिचे गहिरे डोळे.
अथांग. मुकेपणी बोलणारे.
गर्द झाडीच्या वेलांटीसारख्या
भुवयांच्या उत्सुक कमानी.
क्वचित उंचावणाऱ्या.
विशाल वलयांच्या किनारा गाठण्याच्या
बुजऱ्या धडपडीसारखी
डोळ्यांतील ओढ.
गहिरेपण वाढवणारी
आणि काठावरील एकाकी पिंपळासारखे
माझे थरथरते प्रतिबिंब.
उलटे.
अथांगतेत विरणारे.

३०

## आठवण

केतकीबनात शहारणाऱ्या गंधासारखी
अपरिचित संध्याकाळ. तिच्यासमवेत.
( तशी पहिलीच. )

समोरच्या नितळ काळ्या कातळांसारख्या
गडद गहिऱ्या डोळ्यांत
पाहिलेला सूर्यास्त. दूर समुद्ररेषेवरचा.

लाटफुटीत उडणाऱ्या प्रत्येक थेंबात पाहिलेली
सूर्याची रंगीत प्रतिबिंबे.
आणि तिचा हसरा चेहरा पुन्हा त्या प्रत्येक थेंबात.

गंधित उष्ण-श्वासांत मिसळलेला ऊबदार स्पर्श
पावलांपावलांगणिक
हळुवार अननुभवी स्तनांची सलामीलाच जाणवलेली

बुजरी थरथर—
भिजलेली संध्याकाळ अंगावर झेलताना.

शेवटी परतताना
टॅक्सीतल्या मऊशार गादीवर रेलून
तिच्या मधाळ ओठांनी दिले-घेतलेले आगळेच दान

दोन-चारदाच.
अनेक चंद्र चेहरे चुकवीत.
इथे फक्त
स्मशानातल्या धडाडणाऱ्या चितेसारखी
या सर्वांची भडक आठवण.
खोल सलणारी.
स्वतःलाच जाळणारी.

३१

## तावदानाच्या आत-बाहेर

कनेटिकट ॲव्हेन्यूवरील
रुंद दुकानांच्या प्रशस्त खिडक्यांच्या तावदानांमागे
सजवले आहेत आमच्या बेइज्जतीचे पुतळे.

लंच टाईममध्ये विंडो शॉपिंगच्या निमित्ताने
मीही ते पहात निष्कारण वेळ काढतो.
दीड वाजायच्या आत ढुंगणाला पाय लावून ऑफिस गाठतो.

तावदानांच्या आत मांडलेला स्वर्ग, उघड्या मांड्यांच्या
अप्सरा, सोन्या-चांदीच्या दागिन्यांनी मढवलेले
अमाणुसकीचे हुंकार— असं किती किती
आणि तावदानाबाहेर
काचेला चपटं नाक लावून कोटाच्या फाटक्या
खिशात हात दडवलेला
माझ्याच बेइज्जतीचे पुतळे पहाणारा- मी.

'I AM HUNGRY'ची पाटी गळ्यात अडकवून
पुढ्यात फडकं पसरलेला—
त्यावर लोकांनी नाणी फेकण्याची वाट पहात
थंडीच्या कडाक्यात गोठून गेलेला

तावदानाबाहेरचा तो इसम
मला जास्त जवळचा वाटतो.
फरक एवढाच —
त्याची पाठ तावदानाकडे असते.
माझे चपटे नाक तावदानाला लागलेले असते.

## ३२

### पेला जरी रिकामा

पेला जरी रिकामा बेहोष मी पिऊनी
मस्तीत त्या नशेच्या अश्रूंस आवरोनी

अंगावरी नृपाचा पोषाख बांधलेला
झाकून फाटलेली वस्त्रे जुनी पुराणी

उधळून दान उसने विकले जिथे स्वतःला
मी कोणत्या भिकेची गावीत गोड गाणी

खोट्याच माणकांचा शिरपेच घातलेला
लाचार सुरकुत्यांचा सम्राट मी अडाणी

झुकवून मान थोडी मुजरा स्विकारण्याला
पुसतो हळूच सुकल्या डोळ्यांमधील पाणी

खोटा इथे बहाणा सुरईतल्या द्रवाचा
पेला जरी रिकामा बेहोष मी पिऊनी

## ३३

## मौनाची भाषा

काळोखावर हळुच ओढतो
मुका काजवा प्रकाश-रेषा
अन् मौनाला फुटतो अंकुर
अंधाराची घडते भाषा
धुंद तळ्यातिल काळे पाणी
चंद्र नभीचा उरात जपते
अन् वलयांच्या वेटोळ्यांतुन
मौनाचे कोडे उलगडते
वाकुन बसतो काठावरचा
जुनाट पिंपळ काळोखाचा
पर्णापर्णामधून असते
मौनामधली अस्फुट वाचा.
मौन-मौन उलगडते आणिक
शब्दांच्या तळहाती बसुनी
फुटे कवडसा निःशब्दाचा
अंधाराच्या भिंगामधुनी
ओढत राही काळोखावर
मुका काजवा प्रकाश-रेषा
मीच हरवतो मी–पण माझे
विस्मरते मौनाची भाषा !

## ३४

### तेच सूर—तेच गीत

तेच सूर—तेच गीत अर्थ आज आकळले
शब्दाविण कळले ते ओठांतुन उलगडले

विरहाची प्रहररात्र
प्रणयाकुल विकलगात्र
चंद्राच्या सावलीत प्रेमगीत आळविले
शब्दाविण कळले ते ओठांतुन उलगडले

क्षितिजाच्या पार जिथे
अवनीचे भान सुटे
मीलन एकान्ताचे मर्म तिथे सापडले
शब्दाविण कळले ते ओठांतुन उलगडले

प्राणांची दीर्घ साद
ती हुरहुर-ते निनाद
कल्पान्तापलिकडले चित्र मनी रेखियले
शब्दाविण कळले ते ओठांतुन उलगडले

तेच सूर-तेच गीत अर्थ आज आकळले
शब्दाविण कळले ते ओठांतुन उलगडले

## ३५

### माझ्याच कातडीचे

माझ्याच कातडीचे जोडे शिवून आलो
मी फाटका परंतू आभाळरूप झालो

व्रण झेलता उराशी अश्राप सावल्यांचे
जळती कितीक डोळे बेमान मानवांचे
वणव्यातुनी सुखाचा रथ घेउनी निघालो
मी फाटका परंतू आभाळरूप झालो

पोळून धन्य झाले हे पाय चालण्याने
घामेजल्या स्वरांचे उरले उरात गाणे
अंधारल्या दिशांना पंखाविना उडालो
मी फाटका परंतू आभाळरूप झालो

लाचार जीवने ही लखलाभ हो तुम्हाला
नसत्या विवंचनेची मजला तमा कशाला
कुलुपातल्या तिजोऱ्या उधळून आज आलो
मी फाटका परंतू आभाळरूप झालो

३६

## माझ्याच चितेवर जळले

राखेतच बुडवुनी बोटे मी नाव धुंडितो ज्याचे
माझ्याच चितेवर जळले ते गाव तुझे स्वप्नांचे

मी पिसाट होउन साऱ्या तुडविल्या नभातिल वाटा
शोधिता शोधिता अवचित घुसळल्या तमाच्या लाटा
उंचावुन धरले हाती पेटते चूड प्राणांचे
माझ्याच चितेवर जळले ते गाव तुझे स्वप्नांचे

जाहला कसा जखमेतिल हा रंग फिका रक्ताचा
का हृद्यातून निघेना हुंकार तुझ्या सादेचा
दो हाती सावरताना ढासळले तट बुरुजांचे
माझ्याच चितेवर जळले ते गाव तुझे स्वप्नांचे

समजावुनि नाही कळले माझेच मला हे जगणे
बोललो जरी मी नाही आक्रोशुन उमटे गाणे
भिजतात कशाला आता हे काठ असे डोळ्यांचे
माझ्याच चितेवर जळले ते गाव तुझे स्वप्नांचे

## ३७

### सूर लागता लागता

सूर लागता लागता
तार जावी तुटून
वात तेवता तेवता
रात्र जावी सरून

चित्र रेखिता रेखिता
रंग वाळून जावे
गंध हुंगिता हुंगिता
प्राण कंठाशी यावे
स्वप्न पाहता पाहता
झोप जावी टळून
वात तेवता तेवता
रात्र जावी सरून

चंद्र देखिता देखिता
नभी अंधार व्हावा
कंकणांच्या स्वरांचा
नाद पिंजून जावा
रोप वाढता वाढता
क्षणी जावे जळून

वात तेवता तेवता
रात्र जावी सरून

अश्रु ढाळिता ढाळिता
मीच माझे बुडावे
दुःख पोहता पोहता
खोल खोलात जावे
वाट चालता चालता
पाय जावे झडून
वात तेवता तेवता
रात्र जावी सरून

## ३८

### अशी कशी कुणासवे

अशी कशी कुणासवे
उगाच हास हासली
मनातल्या मनात आज
चंद्रकोर लाजली

दिशा-दिशांत दाटला
भरून धुंद गंध हा
जिथे तिथे खुणावितो
मदन-मत्त पारवा
अवेळ साधुनी कुणी
हळूच शीळ घातली
मनातल्या मनात आज
चंद्रकोर लाजली

तृणातृणात पाहिल्या
खुणा अनंत कोवळ्या
वनावनात शोधिले
हरीरूपास सावळ्या
अनंग-संग जोडिता
अभंग प्रीत लाभली

मनातल्या मनात आज
चंद्रकोर लाजली

क्षणाक्षणास पूजिले
अथांग स्वप्न लोचनी
कणाकणात देखिले
तुझेच रूप दर्पणी
मिठीतल्या मिठीत प्रीत-
-रात्र रंग रंगली
मनातल्या मनात आज
चंद्रकोर लाजली

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५८६
काव्य २५७९२

## ३९

### निरखू नका

किंचित झुकलेली डहाळी ......
भोवती वेढलेला उत्सुक अंधार
पाऱ्याचे नितळ ... गडद आकाश
आणि ढगांचे चैतन्यशील आकार –

तृणपात्यांचा हळुवार स्पर्श. हवासा.
वाऱ्याच्या तालावर नाचणारे पाणी
अन् काहीतरी शोधता शोधता अचानक
मनात जुळून येणारी अनोळखी गाणी—

झुकलेल्या डहाळीमागचा तो एकटाच चंद्र
ही गाणी, ते पाणी, हे आकार अन् प्रचंड अंधार:
ही तर साक्षात तिचीच प्रतिमा
या चित्राला असे निरखू नका.

## ४०

### सुरुंग

तुमच्या सगळ्या अपेक्षांना आम्ही सुरुंग लावलेत.

आम्ही आमच्या स्वप्नांचे मुजरे घेत चाललोय.
ह्याच दरबारात आम्ही शिलेदाराचे सम्राट झालो.
आमचे हुकूम झेलत जेव्हा आमचा सूर्य उजाडेल
तेव्हा पंख शाबूत असणारा प्रत्येक पक्षी
गाणे गाईल — आमच्या अपराजित स्वप्नांचेच
त्या वेळी तुमचा सूर्य मात्र
तुम्हाला आमच्या नादान स्वप्नांचेच गाऱ्हाणे सांगत असेल.
कोंबडेही आरवतील आमच्या नपुंसकत्वाची एखादी कोरडी बांग
पण तुम्हाला हे कसे कळणार —
की तुमच्याच परसदारात गाडलेली आमची नाळ
अजून तुटलली नाही.
ओल्या देठातून आज जन्माला येणारे हजारो सम्राट
तुमच्याच नात्याचे ध्वज हाती धरून
मुजरे घेत चाललेत.

तुम्ही तुमच्या सूर्याची गाऱ्हाणी ऐकून
नाराज व्हाल
कारण
तुमच्या सगळ्या अपेक्षांना आम्ही सुरुंग लावलेत.

## ४१

### वेड मला

वेड मला...
गर्द केशर देठांचे
धुंद मंद गंधांचे
फुलण्याचे... खुलण्याचे

वेड मला...
अधिऱ्याशा स्पर्शातुन
देहभान हरखुनसे
धुंद गीत गाण्याचे...
गाण्याचे
आणि निळ्या आभाळी
चंद्राचा वर्ख जसा
नीट जपुन धरण्याचे.
सूर्याच्या मुकुटातुन
हळदीवी आशेने
शुभ्र पिसे खुडण्याचे
वेड मला.

वेड मला...
मौनातुन वदण्याचे

फुलपंखावर बसुनी
मधुसेवन करण्याचे
मुग्धभाव डोळ्यांतिल
हृदयाच्या नात्याने
हलकेसे जपण्याचे
वेड मला.

वेड मला...
वेड फक्त
उरलेले एक. एक
गेलेले क्षण काही
उरलेले क्षण नवीन
एकत्रित धरण्याचे—
धरण्याचे.
क्षितिजाच्या परिघातील
विश्वाची सुखदुःखे
धुंदपणे फुलवाया
आशेने जगण्याचे—
जगण्याचे.
— वेड मला.

## ४२

### एक झाली चूक आता

एक झाली चूक आता
लाख होती वेदना
मी दिली सूर्यास माती
काजव्याला वंदना –

ज्या फुलाला गंध होता
मी न त्याला हुंगिले
जीवनाच्या रौरवातच
स्वर्ग माझे धुंडिले
भंगल्या स्वप्नातुनी का
पूर्ण होते वासना
एक झाली चूक आता
लाख होती वेदना

ना फुलांना वा कळ्यांना
गीत माझे अर्पिले
खड्‌ग माझे वार त्यांनी
मूकतेने सोशिले
का करावी मग तयांना
मी स्वरांची याचना

एक झाली चूक आता
लाख होती वेदना
मी न माझ्या स्वस्तिकाचे
भाग्य भाळी रेखिले
अमृताचे कुंभ लोटुन
जहर प्याले प्राशिले
का हसावे चांदण्यांना
नीर असता लोचना
एक झाली चूक आता
लाख होती वेदना.

मी दिली सूर्यास माती
काजव्याला वंदना
एक झाली चूक आता
लाख होती वेदना.

## ४३

### तयारी

तुमच्या पिचलेल्या आवाजाची पट्टी
आजच दुरुस्त करून घ्या.
डफावर साचलेली धूळ झटकून टाका.
कदाचित त्यावर नवीन कातडंसुद्धा बसवावं लागेल.
तुणतुण्याचा स्वर-जुळवून ठेवा.
खंजिरी-बिंजिरी जाग्यावर आहे ना ?
आणि सुरुवारी, अंगरखे, फेटे, पागोटी
इत्यादी. इत्यादी

आमचे पोवाडे तुम्हाला गावे लागतील
त्या वेळी सर्व तयारी असलेली बरी.

## ४४

### ढोर

परसदारच्या कडुनिंबाचे हलणारे
एकच पान – वाऱ्याशिवाय
आणि त्यामागून लपत छपत येणारे
आभाळी रंगाच्या सूर्याचे तीक्ष्ण-सौम्य किरण –
तसे तुझे डोळ.

श्रावण पालखीतल्या गवताळ मनावर
पसरलेला धुंद तिरकस कवडसा
सोनेरीच
आणि पसरावा हळुवार हाताने त्यावर
स्पर्शाचा चकचकीत पारा –
तशी तुझी नजर.

दवाच्या लाजऱ्या बुजऱ्या थेंबाशी
धीट संवाद मांडणारे
अनोळखी जंगलातल्या बकुळीच्या झाडावरून
टपकणारे एखादे फूल –
तसे तुझे मार्दव.

पुनवेच्या काळोखी उजेडात
न्हाऊन निघालेला खट्याळ रस्ता

आणि कडेशी उंच उभ्या असलेल्या
शिवालयाचा
चकाकता–केवड्याच्या रंगाचा कळस
वर पूर्ण चंद्र —
तसे तुझे ओझरते स्मित.
आणि
मी मात्र —
वैशाखातल्या उन्हात तडकलेली जमीन —
त्यावर
पाण्यासाठी सैराभैरा धावणारे
कंठशोष पडलेले
एखादेच बापुडवाणे ढोर —
तसा मी.

४५

माझे रुंदावता पंख

माझे संपले संपले
आज शैशव कोवळे
दिव्य भासते मनाला
रूप विश्वाचे वेगळे

मऊ घरट्याची ऊब
आता पाहिजे वाटते...
परी उंच आभाळात
ऊन हळू खुणाविते.

एक मारावी भरारी
दाहि दिशांच्या रोख ने
पुन्हा यावे परतून
किती किती दिमाखाने !

बाळ चोच उघडावी
अन् दाण्याच्या रूपाने
विश्व टाकावे गिळून
वाटे वयात आल्याने

काठ नव्या वेदनेचा
नवी झालर सुखाची
कक्षा मर्यादित साऱ्या
नको आयुष्याभोवती

घ्यावे कवेत विश्वाला
पिसे पिसे फुलारून
एका अवघ्या झेपेत
यावे मोकळे फिरून !

आज संपले शैशव
झेप घेऊ आता कुठे ?
माझे रुंदावले पंख
मला आभाळहि थिटे !!

# ४६

## स्ट्रिपटीझ

त्या नाचतच असतात. वस्त्रे उसवीत.
डोळे असतात उघडे:टक्क. थिजलेले.
आम्ही पुढ्यात.
पापण्यांतली पेंग सावरून
निरखीत त्यांच्या नितंबद्ध हालचाली.
डोळ्यांच्या जिभा होऊन लसलसतात
त्यांच्या प्रत्येक गोलाईवरून ...
त्या नाचतच असतात.

त्या नाचतच असतात.
पॉप म्युझिकचे तीव्र स्वराघात ...
गडद् अंधारात धुराची वलये
आणि
जिभेवर बीअरची चव. किंचित कडवट.
एवढे असल्यावर
त्यांचे हिनकळणारे सौष्ठव पाहून
आम्ही टाळ्या पिटतो आपसूक
( कळ्यांचे निर्माल्य होताना )—
केवळ
आमच्या अस्तित्वाची साक्ष म्हणून !

त्या नाचतच असतात - तेव्हा
त्यांना भावनाच नसतात.
तळहातावर पोट घेऊन आमच्या वासनेची कबुतरे
त्या फुलारत असतात.
द्यावे-घ्यावे एवढाच फक्त उरतो व्यवहार ...

पाप-पुण्य; नीती-बीती सगळेच अविचार.
त्यांच्या कचकडी चेहऱ्यावर
तेच थरथरते निरागस हसू - वस्त्रे उसवताना
आणि आमच्या देहात
चितेची चंद्रचुंबी आग !!

त्या नाचतच असतात. वस्त्रे उसवीत
डोळे असतात उघडे टक्क. थिजलेले.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ..........
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

४७

## संपले का सांग सारे

संपले का सांग सारे सांग आता सांग ना—
गंध नाही चंद्‌ना.

धावले वेड्यापरी मी पाहुनी फसव्या खुणा
ज्या स्वरांचे गीत व्हावे तेच झाले वंचना
बांधिली स्वप्ने उराशी हाच का माझा गुन्हा—
गंध नाही चंद्‌ना.

नीर ना येते जराही आज माझ्या लोचना
कोरडी मी या प्रवाही कोरड्या संवेद्‌ना
व्यर्थ गेल्या साधनेची हीच अंतिम वेद्‌ना—
गंध नाही चंद्‌ना.

शून्य आता वंद्‌ना ही शून्य ही आराधना
पटल्या द्‌ाही दिशा अन् पेटली मधुभावना
हुंदक्यांचे गीत हृदयी ऐक माझ्या स्पंद्‌ना—
गंध नाही चंद्‌ना.

## ४८

### अवसेच्या रात्रीमधला

अवसेच्या रात्रीमधला
अंधार कवडसा विझतो
पेरता बीज चंद्राचे
कुणी चंद्र-चेहरा हसतो

स्वप्नांकित गंध फुलांचा
अवघडतो श्वासांमधुनी
पानांच्या हिर्वाळीतुन
कुणी चंद्र-चेहरा हसतो

पाण्याचा तळ भिजलेला
त्या अवचित स्पर्श खुणांनी
रोमांचित वाळूवरती
कुणी चंद्र-चेहरा हसतो

लाजून लाट थरथरते
वेळावुन येता-जाता
पलिकडून प्रतिबिंबाच्या
कुणी चंद्र-चेहरा हसतो.

## ४९

### मी निघालो तेव्हा

मी निघालो तेव्हा
तूच ना माझ्या हातावर दही-साखर ठेवलंस—
म्हणालीस ...
खूप मोठ्ठा हो— लवकर परत ये.
तेव्हा मी तुला वाकून नमस्कार केला.
तुझी बोटं माझ्या केसांतून फिरताना
जाणवलेल्या त्या स्पर्शाचं अमृत
अजून मला नवजीवन देतंय.
मला खरंच लवकर परत यायचंय
पण मी मोठ्ठा केव्हा होणार ?

## ५०

### अंतर

एक खाण तुमच्यासाठी
दुसरी आहे आमच्यासाठी

एक असेल कोळशाची
दुसरी रत्न-पाचूंची

दोन्ही अजून बंदच आहेत
कुदळ फावडी तयार आहेत

इशारा होताच पुढे व्हाल
बळ एकवटून पाटी भराल

कळेल बाहेर आल्यानंतर
आपल्यामध्ये केवढे अंतर

## ५१

### झाले पोटुशी आभाळ

झाले पोटुशी आभाळ
आल्या क्षितिजास वेणा
माझ्या अल्लड स्वप्नांचा
खेळ चाले जीवघेणा

सुस्त आसमंत सारे
जाग हळूच ये कोण।
शीळ घुमवित वारा
गेला होऊन दिवाणा

नभ वाकले जराशी
झाल्या फिक्या चंद्रखुणा
त्याच चांदण्यांना आज
नवा पाझरतो पान्हा

भुई जाहली उत्सुक
झाडे उंचावती माना
दशदिशांतुन गेला
एक रंगून तराणा

घडे उत्सव अनंत
रोज नवाच उखाणा
आला जन्मास नव्याने
गोल किरमिजी तान्हा.

५२

## भेदून सूर्य सगळे

भेदून सूर्य सगळे आलो जरी घरासी
तव मूक आर्जवांना मज घेऊ दे उराशी

ओलांडुनी दिले मी आव्हान सागराला
शरणागती परंतू दो-चार आसवांशी

लाथाडले कितीदा गिरी उंच वेदनांचे
घोटाळतो तरी मी अलवार स्पंदनांशी

फेकीत बाण जातो छेदून सावजाला
जाळ्यात मी परंतू गुंतून कुंतलांशी

परजून शस्त्र केले बेछूट वार कैक
घायाळ मात्र होतो माझ्यातल्या तुझ्याशी.

## ५३

### कधी कधी वाटायचे

कधी कधी वाटायाचे
हळू तुझ्या दारी यावे
कोंडलेल्या क्षितिजांना
मार्ग नवे दाखवावे

कधी कधी वाटायाचे
दारातून आत यावे
असेल ते सारे सारे
देऊनीया रिते व्हावे

कधी कधी वाटायचे
असे काहीतरी व्हावे
माझ्या सर्वस्वाचे धन
तुझ्या ओंजळीत जावे

असे वाटूनीया आलो
रिते व्हाया..रिते व्हाया
दान देण्या आलो...पण
गेलो भीक घेऊनीया.

## ५४

### ओळख

पायी रुतल्या काट्याची
सले वेदना उरात
रस्त्याकडच्या उन्हाची
झळ लागते घरात

तळ पाण्याचा बिलोरी
फुटे गोठून वेदना
नाते अश्रूंच्या जळाशी
भग्न धाग्यांचे जुळेना

मूक झाडांचे स्पंदन
डोह काठाशीच झुरे
स्तब्ध सावलीच्या आत
लाख श्वासांचे निखारे

पाने गाळणारा वड
उभा एकाकी तळ्याशी
मीच ओळखले मला
खूण पटली मनाशी.

## ५५

### हळदीच्या ओल्या वाटा

हलकासा फिरवुन हात
भर सळ भांगाची आता
ह्या कशास केल्या सांग-
हळदीच्या ओल्या वाटा

दारात सांडले माप
अन् क्षितिज नवे झुकलेले
हळदीच्या पाऊल-मार्गी
स्वप्नांचे उंचच इमले

मी मलाच हरवून बसलो
ही कितिक युगांची गाथा
अश्राप जीवांचे नाते
हळदीच्या ओल्या वाटा !

## ५६

### रंगुन गेले

रंगुन गेले
धुंद तराणे —
    रंगुन गेली राणी

हरवुन बसला
त्यातच राजा—
    शोधित अपुली गाणी

त्या गाण्यांना
शब्दच नव्हते—
    नुसत्या अस्फुट ताना

रंगुन गेले
राजा-राणी—
    उत्सुक राघू-मैना... !

## ५७

### ज्या दिशेचा रंग खुणवी

ज्या दिशेचा रंग खुणवी त्या दिशेला जाऊ या
हात हाती घेउनी ही आत्मगीते गाउ या
स्नेहभावे राहु या—

चालत्या पायांत काटे वाट जेव्हा आंधळी
धावणाऱ्या अश्वपाठी चार स्वप्ने कोवळी
सावरू ते अश्व त्यावर स्वार आपण होउ या
हात हाती घेउनी ही आत्मगीते गाउ या
स्नेहभावे राहु या—
ज्या दिशेचा रंग खुणवी त्या दिशेला जाउ या

जोडिले आम्ही ध्वजाशी एक नाते वेगळे
दूर तीर्थांच्या नद्या अन् दूर सारी देवळे
राहिले जे दूर त्याचा मान हृदयी ठेवु या
हात हाती घेउनी ही आत्मगीते गाउ या
स्नेहभावे राहु या—
ज्या दिशेचा रंग खुणवी त्या दिशेला जाउ या

वारसा आम्हीच येथे संस्कृतीचा पेरला
आमच्या भाळी युगाचा मंत्र आम्ही कोरला

पेलताना सूर्य सगळे पाय भूवर ठेवु या
हात हाती घेउनी ही आत्मगीत गाउ या
स्नेहभावे राहु या—
ज्या दिशेचा रंग खुणवी त्या दिशेला जाउ या

## ५८

### नाती

कितीक सरले चैत्र उन्हाळे
कितीक सरल्या राती--
किती किती समईंतुन जळल्या
आठवणींच्या वाती.

किती धुक्याचे पाट वाहले
अबोल झाली माती—
किती हिमाचे कड कोसळले
अभंग अपुली नाती.

५९

## प्रश्न

पेटत्या सूर्याच्या भोवती
काळाकुट्ट अंधार दाटून आलाय.
प्रकाशाची किनार नसलेले
सगळे चिंब ढग.

एकदा झडझडून पाऊस तरी पडून जावा—
सूर्य मोकळा व्हावा.

पण त्या पावसाने
सूर्यच विझला तर?

## ६०

### ही असली मुग्ध

ही असली मुग्ध...
अझेलियाच्या रंगाची
आणि हनीसकल्च्या वासाची
तरुण संध्याकाळ—
माझ्या गात्रागात्रांत उतरते.

...आणि वारा प्यालेल्या वासराप्रमाणे
चौखूर उधळलेले
माझे मन
क्षणिक थांबून पुन्हा उधळते
आठवणींना उसवत.
विस्कटत.

मग रात्रभर
जर्द केवड्याची पिवळी कणसे
आणि मधुमालतीचे गुच्छ
माझ्यासभोर झिम्मा खेळतात.

६१

## हिमगंधाच्या लाटा

हिमगंधाच्या लाटा लाटा
मस्त झपाटुन येती
सुस्त नभाच्या निळाईला अन्
रंग आपुला देती

त्या लाटांवर आंदोलत मी
फूल नभाचे खुडतो
अन् निष्पर्णी वृक्षांवरती
साज हिमाचा चढतो.

## ६२

### नांदी

मी या लोकांचा प्रतिनिधी आहे.
हे प्रतिनिधित्व मला कुणी बहाल केलेले नाही
दान दिलेले नाही
किंवा मी स्वतः ते भांडून अथवा मागूनही घेतले नाही.
ते मी जाणिवेने स्वीकारलेले आहे.

त्या जाणिवेच्या आत आहेत
निळयाशार आभाळाचे दुभंगलेले अर्थ
आणि दुभंगलेल्या संस्कृतीला
जोडणाऱ्या महासागराच्या सलग वेदना.

यांची वाणी माझे शब्द घेऊन येणार आहे
तुमची शस्त्रे खाली ठेवा.
शरण येऊ नका. कारण युद्ध अजून पुकारलेले नाही.

तुमच्याच हाडामासांचे हे घटक आहेत
वाट चुकलेले म्हणू नका.
कदाचित त्यांनाच नेमकी वाट सापडली नसेल कशावरून ?
माना उंचावून हे या दिशाहीन वाटेवरून चालत आहेत.
या वाटांचे राजरस्ते बनविण्याचा वसा यांनी घेतलाय.
तो उतून मातून टाकणार नाहीत.

यांच्या उरातील शल्ये,
ठणकणाऱ्या वेदना- तडफड
आणि या सगळ्यावर अस्मितेचे पांघरूण घालून
यांनी उभारलेला आनंदमय सेतु

यांतील काहीच तुम्हाला दिसत नाही ?
कसे दिसणार ? म्हणून म्हणतो, तुमची शस्त्रे खाली ठेवा.
या सेतूवरून तुम्ही त्यांच्या वाटेने जायलाच पाहिजे
असं नाही.— पण जाऊ शकाल.
जर या सेतूवरून हे माघारी आलेच तर
त्यांच्या स्वागताला तरी हजर रहा.
तेवढे पुण्य गमावू नका.

पुढच्या युगाची नांदी आज सुरू झाली आहे.
तुमची बेगडी मूल्ये झुगारून द्या.
सनातनी शेंडीभोवती घोंघावणाऱ्या रूढींच्या माश्यांवर
चिरंतन विचारांचे फवारे मारा
तुमच्या लडबडीत कण्याला ताठ होऊ द्या.
पायांचे ध्वज रोवून सज्ज उभे रहा
अन्यायाविरुद्ध उगारायला तुमचे हात तयार असू द्या
आणि नजरेतील लाचारी सोडून जरा अधिक
आत्मविश्वास येऊ द्या —
मग इकडे पहा

— पहा तुमची न यांची ओळख पटते की नाही ते !
तुमच्याच हाडामासांचे हे घटक आहेत
यांची वाणी माझे शब्द घेऊन येणार आहे
तुमची शस्त्रे खाली ठेवा.
शरण येऊ नका–कारण युद्ध अजून पुकारलेले नाही.

●

REFBK-0025792
REFBK-0025792

